PRESS NOTE
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१

कृपया प्रसिध्दीकरिता सादर
संपादक/वृत्तसंपादक

9/X/2015

(हनुमंत गोफणे)
जनता संपर्क अधिकारी
२२८१६६५६/२२८४१२५५

प्रसिध्दी पत्रक क्र.४४
दिनांक : ०९.१०.२०१५

'महालक्ष्मी' जत्रे साठी 'बेस्ट' च्या जादा बसगाडया

मुंबई, ०९ : दिनांक १३.१०.२०१५ ते २१.१०.२०१५ या कालावधीत साज-या होणा-या नवरात्रौत्सव निमित्ताने महालक्ष्मी मंदिरात जाणा-या भाविकांच्या सोयीसाठी याही वर्षी बेस्ट उपक्रमातर्फे बसमार्ग क्र.३३, ३७, ५७, ६३, ७७, ८३, १२४, ३०५ आणि ३५७ या बसमार्गांवर; तसेच भायखळा स्थानक (प) ते महालक्ष्मी मंदिर दरम्यान महालक्ष्मी विशेष -८१११ या बसमार्गांवर अशा एकूण २१ जादा बसगाडया सोडण्यात येणार आहेत. तसेच दिनांक २२.१०.२०१५ रोजी दस-याच्या दिवशी बसमार्ग क्र.६३ वर भायखळा स्थानक (पश्चिम) ते महालक्ष्मी मंदिर दरम्यान ३ जादा बसगाडया चालविण्यात येणार आहेत.

प्रवाशांच्या मदतीसाठी वत्सलाबाई देसाई चौक (हाजीअली), वसंतराव नाईक चौक (ताडदेव), जे. मेहता मार्ग, भायखळा रेल्वेस्थानक (पश्चिम), महालक्ष्मी रेल्वे स्थानक आणि महालक्ष्मी मंदिर येथील बसथांब्यावर बसनिरीक्षकांची व वाहतूक अधिका-यांची नेमणूक करण्यात येणार आहे.

प्रवाशांना या जादा बसगाडयांचा लाभ घ्यावा, असे बेस्टतर्फे आवाहन करण्यात येत आहे.